Trust Registration Number F-3967 Bombay

**Maharashtra Judo Association**

Affiliated to Judo Federation of India and Maharashtra Olympic Association

**महाराष्ट्र ज्युदो असोसिएशन**

संलग्न: ज्युदो फेडरेशन ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन

**Datta Aphale**
**General Secretary**
Flat No. 401, Wing 'O',
Balwantpuram Samrajya,
Pethkar Projects, Shivtirth Nagar,
Paud Road, Kothrud, Pune 411 038
Cell- 94231 50231; 90499 98765
gs.mahajudo@gmail.com

20 जुलै 2019, पुणे

प्रति,
मा. सचिव, जिल्हा ज्युदो संघटना

विषय: 47 वी महाराष्ट्र राज्य सबज्युनियर्स आणि कॅडेट ज्युदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धा-2019-जळगांव

महोदय / महोदया,

कळविण्यास आनंद होतो की, महाराष्ट्र ज्युदो संघटनेनी सबज्युनियर्स – कॅडेट गटाच्या राज्य स्पर्धा तसेच राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धा, जळगांव येथे 'जळगांव जिल्हा हौशी ज्युदो संघटना' यांच्या सहकार्याने आयोजित केल्या आहेत. सदरील सबज्युनियर्स आणि कॅडेट गट एकत्र करण्याचा निर्णय फेडरेशनच्या दिनांक 06 जुलै 2019 रोजी दिल्ली येथील वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये घेण्यात आला आहे. त्यानुसार आपण आता या राज्यस्पर्धा आयोजित करणार आहोत. ज्युदो फेडरेशन ऑफ इंडियातर्फे सबज्युनियर्स गटाच्या राष्ट्रीय स्पर्धा दिनांक 14 ते 18 सप्टेंबर 2019 दरम्यान इंफाळ, मणीपुर येथे आयोजिल्या असल्याचे कळविले आहे.

47 व्या राज्य सबज्युनियर्स-कॅडेट ज्युदो स्पर्धेचा तपशील खालीलप्रमाणे ;

1) **कालावधी**: दिनांक 23, 24 आणि 25 ऑगस्ट 2019 (शुक्रवार-शनिवार आणि रविवार)
2) **ठिकाण**: श्री छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल, बस स्टँड मार्ग, जळगांव
3) **वेळापत्रक**: (1) दिनांक 23 ऑगस्ट – खेळाडुंचे दुपारी 1.00 वाजेपर्यंत आगमन, त्यानंतर वयाचे दाखले तपासणे, वजने घेणे. संध्या. 6 वाजता व्यवस्थापक मीटिंग, लॉटस टाकणे, उद्घाटन समारंभ आणि स्पर्धेस प्रारंभ
(2) दि. 24 व 25 ऑगस्ट - स्पर्धा- सकाळी 8 ते स्पर्धा वेळापत्रक संपेपर्यंत.
4) **एंट्री फॉर्म** सोबत जोडलेला असून तो व्यवस्थित टाईप करून दिनांक 20.08.2019 पर्यन्त महाराष्ट्र ज्युदो संघटनेच्या वेबसाईटवर (www.mahajudo.com) अपलोड करावा. यावर्षीच्या सबज्युनियर्स स्पर्धांपासून आपण सर्व एंट्री (प्रवेशिका) ऑनलाइन पद्धतीने स्वीकारणार आहोत. यासाठी आपण आपल्या खेळाडूंची यादी त्यांच्या तपशीलांसह आणि प्रत्येकाचा पासपोर्ट आकाराचा फोटो आधी तयार ठेवावा. एंट्री भरण्याआधी सर्वांनी खालील महत्वाचे मुद्दे लक्षात घ्यावेत आणि मगच फॉर्म ऑनलाइन सबमिट करण्यास सुरुवात करावी.

(ऑनलाइन प्रवेशिका भरताना आपणास काही अडचण आली तर लगेचच श्री आदर्श शेट्टी – 98338-57072 यांच्याशी संपर्क साधावा.)

1. प्रवेशिकाच्या यादीमध्ये खेळाडूंची पूर्ण नाव, जन्मतारीख, पत्ता (जिल्ह्याचे नाव) आधार कार्ड नंबर आदी माहिती भरावयाची आहे. यासाठी ऑनलाइन यादी भरण्याआधी आपण खेळाडूंच्या नावांचे स्पेलिंगसह ही सर्व माहिती सुनिश्चित करावी यासह **प्रत्येक खेळाडूचा पासपोर्ट आकारातील फोटो** देखील पुढील रेकॉर्डसाठी खेळाडूंकडून घ्यावा. हा फोटो स्पर्धास्थळी ओळखपत्रासाठी द्यायचा आहे.
2. सर्वप्रथम www.mahajudo.com या लिंकला क्लिक करावे.
3. डाव्या बाजूला निळ्या रेघा असलेल्या आयकॉनवर किल्क करा. आलेल्या सूचीमधील "इव्हेंटस" ला क्लिक करा. तेथे "Events" याखाली "एंट्री फॉर्म्स" या सब-मेनूवर क्लिक करा.
4. येथे आपल्याला स्पर्धेचे नाव दिसेल. त्याला क्लिक करा आणि एंट्रीफॉर्म डाउनलोड करा.
5. Excel Sheet मधील हा एंट्रीफॉर्म आपण वाचून काळजीपूर्वक सर्व माहितीसह नीटपणे भरावा, यामध्ये सर्व स्पेलिंग बरोबर असावेत.
6. फॉर्म भरल्यावर तो स्पेलिंगच्या माहितीसह सर्व माहिती योग्य आणि बरोबर भरल्याची खात्री केल्यावर आता वेबसाईटवर जा आणि तेथील "Events" मेनूमध्ये –अपलोड एंट्रीफॉर्म "Upload entry form" या सबमेनूला क्लिक करा.

7. लॉगिन पेज उघडले जाईल. तेथे पासवर्ड टाकावे. हे पासवर्ड आपल्याला दिले जातील.
8. लॉगिन झाल्यावर आपल्याला स्पर्धेचे नाव दिसेल आणि त्याखाली एंट्रीफॉर्म अपलोड करण्याची जागा असेल तेथील बटणावर क्लिक करावे. आपण जो एंट्रीफॉर्म भरला आहे तो येथे अपलोड करावा.
9. एंट्रीफॉर्म यशस्वीरीतीने आपलोड झाल्यावर एक एक नवे पान उघडले जाईल आणि तेथे आपण जो एंट्रीफॉर्म भरला आहे ज्यात खेळाडूंची नावे आहेत त्याची कॉपी दिसेल. आपण भरली असलेली नावे त्यात आहेत याची खात्री करावी.
10. यावर्षीपासून जनरल सेक्रेटरी यांना पत्रव्यवहार करण्यासाठी हा स्वतंत्र मेल आयडी "gs.mahajudo@gmail.com" या नावाने सुरू केला असल्याची सर्वांनी कृपया नोंद घ्यावी आणि ज्युदो संदर्भातील या पुढील सर्व पत्रव्यवहार या मेल आयडीवरच करावा. **(जी एस नंतर टिंब (.) आहे हे ध्यानात घ्यावे.)**

जिल्ह्याने सॉफ्टकॉपीच्या एंट्रीद्वारे पाठविलेल्या खेळाडूच्या माहिती आपण खेळाडूंची स्पर्धेची प्रमाणपत्रे कम्प्युटरच्या माध्यमातून प्रिंट करण्यासाठी आणि नोंदणी ओळखपत्रे तयार करून देण्यासाठी वापरणार आहोत. ज्या खेळाडूंना ओळखपत्रे दिली जातील त्या खेळाडूंना यापुढे तीन वर्षांपर्यंत आयोजित होणाऱ्या राज्यस्पर्धेसाठी जन्मतारखेचे दाखले पुन्हा एमजेएला सादर करण्याची गरज नाही.

यासाठी सर्वांना पुन्हा एकदा सूचना की, खेळाडूंच्या माहितीच्या (सॉफ्टकॉपीच्या ) विवरणामध्ये योग्य स्पेलिंगसह पूर्ण नाव, जन्मतारीख इत्यादी, जिल्हा सचिवांनी अत्यंत काळजीपूर्वक भरावी. यदाकदाचित जर नावांमधील काही चुका झाल्यास आणि त्याप्रमाणे आयडी-कार्ड आणि सर्टिफिकीट प्रिंट झाल्यास परत ओळखपत्रे किंवा प्रमाणपत्रे तयार केले जाणार नाहीत आणि या नुकसानीस जिल्हा संघटना सर्वस्वी जबाबदार असेल.

एंट्री फॉर्मच्या हार्डकॉपीवर अध्यक्ष अथवा सचिव यांनी स्वाक्षरी करून हा एंट्री फॉर्म अधिकृत संघ व्यवस्थापकांबरोबर स्पर्धेठिकाणी जन्मतारखेच्या दाखल्यांसह द्यावा.

- एंट्रीबरोबर प्रत्येक खेळाडूचे जन्मतारखेचे मूळ (ओरिजिनल) दाखले आणि त्यांच्या झेरॉक्स-प्रती **एक पासपोर्ट आकाराचा फोटोसह** जमा कराव्यात.
- मूळ कागदपत्रांद्वारून झेरॉक्स दाखले तपासून प्रमाणित केले जातील आणि ते MJA रेकॉर्डसाठी ठेवले जातील. मूळ कागदपत्रे जिल्हा संघ व्यवस्थापकांकडे लगेच स्पर्धास्थळीच दिली जातील याची नोंद घ्यावी.
- त्यामुळे संघ व्यवस्थापकांनी झेरॉक्स दाखले सत्यापित झाल्यावर मूळ दाखले आठवणीने न्यावेत. ही जबाबदारी संघ व्यवस्थापकांची असेल. ते संघ व्यवस्थापकांनी मूळ दाखले परत न नेल्यास / गहाळ झाल्यास राज्य ज्युदो संघटनेचे कोणतेही पदाधिकारी, आयोजक संघटनेचे पदाधिकारी अथवा स्पर्धेसाठी नेमलेले कोणतेही तांत्रिक अधिकारी जबाबदार असणार नाहीत याची नोंद घ्यावी आणि संघ व्यवस्थापकांना काम झाल्यावर दाखले परत घेण्याच्या सूचना जिल्हा सचिवांनी गांभिर्याने द्याव्यात.

✓ पाठवलेल्या एंट्रीमध्ये आपण दिनांक 20.08.2019 रोजीच्या रात्रो 11.59 पर्यन्त बदल करू शकता, मात्र त्यानंतर केले बदल हे उशीराची एंट्री समजली जाईल.
✓ उशीराची एंट्री दिनांक 21.08.2019 रोजी रात्रो 11.59 पर्यन्त स्वीकारली जाईल. आणि या उशीराच्या एंट्रीस रु. 1,000/- शुल्क आकारले जाईल.
✓ दिनांक 22.08.2019 रोजी एंट्री स्वीकारणे सिस्टिम बंद करेल.
✓ प्रवेशिकांमधे दिल्या गेलेल्या वजनगटामध्येच खेळाडूला खेळावे लागेल.
✓

5) **प्रवेश शुल्क**: रुपये 300/- प्रत्येकी; निमंत्रित संघ - रुपये 3,000/-

✓ सदरील प्रवेश शुल्क एकूण संघातील खेळाडूंच्या संख्येनुसार रुपये 300/- प्रत्येकी याप्रमाणे बँक ऑफ महाराष्ट्रच्या आपल्या गावातील शाखेत खाते क्रमांक 20 12 45 16 561 यामध्ये भरावे. बँकेच्या पैसे भरणा पावतीची फोटोकॉपी श्री रवी मेटकर यांना (94227-62631) यावर लगेच व्हाट्सअप करावी आणि मूळ पावती जळगाव येथे स्पर्धास्थळी एंट्री फॉर्म बरोबर द्यावी.
✓ भोजन खर्च, संलग्नता शुल्क आणि ओळखपत्राचे शुल्क हे स्पर्धास्थळी द्यावेत.
✓ फक्त प्रवेश शुल्क बँकेच्या खात्यात भरावे.

निमंत्रित संघांसाठी प्रवेश शुल्काव्यतिरिक्त वर्षातील तीनही स्पर्धांचे एकत्रित शुल्क सबज्युनियर्स स्पर्धांवेळी जमा करण्याबाबतच्या सातारा येथील 23.07.2017 रोजी आयोजित वार्षिक सर्वसाधारण बैठकीमधील एकमताच्या ठरावाप्रमाणे, सर्व निमंत्रित संघांना सबज्युनियर्स-कॅडेट, ज्युनियर्स तसेच सिनियर्स स्पर्धांचे वार्षिक एकत्रित शुल्क रुपये 3000/- जळगांव येथेच भरावे लागेल.

6) **नोंदणी ओळखपत्र शुल्क**: रु. 100/- प्रत्येकी (खेळाडूची नोंदणी तीन वर्षातून फक्त एकदाच करायची आहे.)

7)**भोजन खर्च**: रु. 500/- प्रत्येकी. (दि. 23 ते 25 ऑगस्ट 2019- एकूण 2 नाश्ता, 5 भोजन);

**मुली आणि मुलांच्या रहाण्याची, खेळण्याची आणि भोजनाची व्यवस्था** – दि. 23 ऑगस्टच्या रात्रीपासून ते 25 ऑगस्ट 2019 रात्रीपर्यंत श्री छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल, बस स्टँड मार्ग, जळगांव येथे केली आहे.
व्यवस्थापक-प्रशिक्षक नसलेल्या संघास निवासाची व्यवस्था करून दिली जाणार नाही.

8) प्रत्येक संघास वर्तणूक हमी म्हणून रु 1,000/- ठेवरूपात भरावे लागतील.
9) सर्व संघांनी दिनांक 23 ऑगस्ट 2019 शुक्रवार रोजी दुपारी किमान 1.00 वाजेपर्यंत नक्की पोहचावे.
10) एका वजनगटात प्रत्येक जिल्हा संघाच्या मुले आणि मुली यांच्या प्रत्येक गटामधे एका खेळाडूस भाग घेता येईल तसेच प्रवेशिकांमधे दिलेल्या वजनगटामध्येच खेळाडूला खेळावे लागेल.
11) स्पर्धा जेएफआयच्या प्रचलित नवीनतम नियमांप्रमाणे घेण्यात येतील. ज्या ठिकाणी मुंबई संघाचा खेळाडू विजेता असेल त्या वजनगटाच्या राष्ट्रीय स्पर्धेच्या निवड स्पर्धा रौप्य आणि कांस्य विजेत्यामधून स्पर्धास्थानी लगेचच घेऊन संघाचा खेळाडू निवडला जाईल.

12) **वयगट**: जन्मतारखेची मर्यादा –
सबज्युनियर्स गट -12 वर्षांवर आणि 15 वर्षांखाली
(कॅलेंडर वर्ष 2007-2006 आणि 2005 वर्षातील जानेवारी ते डिसेंबर महिन्यांमध्ये मध्ये जन्मलेले खेळाडू)
कॅडेट गट – 15-16-17 वर्षांचे खेळाडू अर्थात 15 वर्ष पूर्ण आणि 18 वर्षाखाली
(कॅलेंडर वर्ष 2004-2003 आणि 2002 वर्षातील जानेवारी ते डिसेंबर महिन्यांमध्ये मध्ये जन्मलेले खेळाडू)
खेळाडू त्यांच्या संबंधित वजनगटामध्येच खेळू शकतील. जन्मतारखेच्या दाखल्यासंदर्भात जेएफआयच्या नियमाप्रमाणे खालील तीन मूळ अधिकृत प्रतिमधे त्यांच्या झेरॉक्ससह वयाचा दाखला आणणे गरजेचे आहे. **याशिवाय खेळाडूला खेळण्यास परवानगी मिळणार नाही.**

- **अ)** महानगरपालिका / पंचायत समिती अथवा समरूप शासकीय अधिकृत व्यक्तिद्वारा जारी वयाचा दाखला / विभागातील सक्षम मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी लेटरहेडवर सहीशिक्यांनीशी जारी केलेला दाखला,
- **ब)** मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी लेटरहेडवर सहीशिक्यांनीशी जारी केलेले प्रमाणपत्र ( यामधे जन्मतारीख, वडिलांचे नाव, विद्यार्थ्याचा शिकत असलेला वर्ग, पत्ता, टेलिफोन क्रमांक, आणि शाळेचा फॅक्स आणि दूरध्वनी क्रमांक लिहिलेला असायला हवा. ही माहिती विद्यार्थ्याच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोवर रबरी शिक्का आणि मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह साक्षांकीत (अटेस्टेड) केलेले हवे.
- **क)** भारत सरकारतर्फे जारी केलेल्या आधार कार्डाची मूळ प्रत

हे तीनही दाखले अनिवार्य असून याशिवाय खेळाडूस खेळू दिले जाणार नाही. (दाखल्याच्या प्रमाणासाठी जेएफआयचे स्पर्धेसंदर्भातील मूळ इंग्रजी परिपत्रक ग्राह्य धरले जाईल. खेळाडुंचे वय हे कॅलेंडर वर्षाप्रमाणे जानेवारी ते डिसेंबर असे गृहीत धरले जाईल.)

## वजनगट- सबज्युनियर्स- मुले- मुली

| 12 वर्षांवर | सबज्युनियर्स - मुले -7 वजनगट | सबज्युनियर्स मुली-7 वजनगट |
|---|---|---|
| (वयवर्षे 12 | 35 किलोवर आणि 40 किलो आणि खाली | 32 किलोवर आणि 36 किलो आणि खाली |
| पूर्ण झालेली) | 40 किलोवर आणि 45 किलो आणि खाली | 36 किलोवर आणि 40 किलो आणि खाली |
| आणि 15 | 45 किलोवर आणि 50 किलो आणि खाली | 40 किलोवर आणि 44 किलो आणि खाली |
| वर्षाखाली. | 50 किलोवर आणि 55 किलो आणि खाली | 44 किलोवर आणि 48 किलो आणि खाली |
| जन्मसाल- | 55 किलोवर आणि 60 किलो आणि खाली | 48 किलोवर आणि 52 किलो आणि खाली |
| 2005, 2006 | 60 किलोवर आणि 66 किलो आणि खाली | 52 किलोवर आणि 57 किलो आणि खाली |
| आणि 2007 | 66 किलोवर | 57 किलोवर |

वजनगट- कॅडेट मुले- मुली

| | कॅडेट मुले -8 वजनगट | कॅडेट मुली -8 वजनगट |
|---|---|---|
| 15 वर्षावर (वयवर्षे 15 पूर्ण झालेली) आणि 18 वर्षाखाली (म्हणजेच 15-16 आणि 17 वर्षे) जन्मसाल- 2002, 2003 आणि 2004 | 50 किलो खाली<br>55 किलो खाली<br>60 किलो खाली<br>66 किलो खाली<br>73 किलो खाली<br>81 किलो खाली<br>90 किलो खाली आणि<br>90 किलोवर | 40 किलो खाली<br>44 किलो खाली<br>48 किलो खाली<br>52 किलो खाली<br>57 किलो खाली<br>63 किलो खाली<br>70 किलो खाली आणि<br>70 किलोवर |

**वय सत्यापन चांचणी** (Age verification Test -AVT)

वय सत्यापन चाचणी म्हणजे डिजिटल एक्सरे टी डब्ल्यु टेस्ट. यासाठी खालील माहिती नीट वाचावी;

मागील वर्षीपासून फेडरेशनने वयाच्या सत्यापनाविषयी चाचणी करण्याची प्रक्रिया अनिवार्य केलेली आहे. या चाचणीशिवाय राष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळू दिले जाणार नाही. आपण जरी राज्यस्पर्धेसाठी ही चाचणी अनिवार्य करणार नसलो तरी राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडल्या गेलेल्या खेळाडूंनी मात्र ही चाचणी करणे **अत्यावश्यक** आहे. त्यामुळे, राज्याच्या संघामध्ये जे खेळाडू निवडले जातील त्या खेळाडूंनी जळगांव येथील स्पर्धा संपल्यावर लगेचच ही चाचणी त्यांच्या गावी करावी अन्यथा त्यांना राष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळू दिले जाणार नाही. **शक्यतो** ही चाचणी शासकीय दवाखान्यात करावी. जर तशी सोय आपल्याकडे उपलब्ध नसेल तरच ती इतर ठिकाणी करावी. याचे कारण म्हणजे गतवर्षी खेलो इंडिया स्पर्धादरम्यान काही खेळाडूंना प्रमाणित चाचणी पुरावा असूनही अडचणीचा सामना करावा लागला आणि राष्ट्रीय स्पर्धेत खेळण्यापासून मुकावे लागले. अशा वेळेस शासकीय दवाखान्यातील पुरावा हा सबळ ठरू शकतो.

AVT लिंक https://form.jotform.me/sportingethos/avp-jfi-march2018 यावर क्लिक करावे आणि आलेल्या फॉर्ममध्ये माहिती काळजीपूर्वक भरावी. या चाचणीची मूळ माहिती फेडरेशनच्या गतवर्षीच्या परिपत्रकामद्धे इंग्रजीमध्ये दिलेली आहे, ती पहावी.

13) आजपर्यंतचा अनुभव असा आहे की, राष्ट्रीय स्पर्धेसाठी राज्याच्या संघामध्ये निवडल्या गेलेल्या खेळाडूंपैकी काही खेळाडू स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी सूचना देताना हजर नसतात, तेंव्हा संबंधित खेळाडू अनुपस्थित राहू नयेत याची काळजी संघ व्यवस्थापकांनी घ्यावी आणि या मिटिंगसाठी खेळाडू उपस्थित रहाण्याची ताकीद द्यावी.

फेडरेशनने कळविल्याप्रमाणे राष्ट्रीय स्पर्धेच्या सहभागासाठी निर्धारित ज्युदोगी घालूनच खेळावे लागेल. यासाठी अशा ज्युदोगीची उपलब्धता करणे ही जबाबदारी राज्य संघामध्ये निवडल्या गेलेल्या प्रत्येक खेळाडूची वैयक्तिक जबाबदारी असेल.

केंद्र सरकारच्या धोरणानुसार डोपिंगबाबत कडक धोरण राबवले जात असल्याने डोपिंग टेस्ट गांभिर्याने केल्या जात आहेत. काही दिवसांपूर्वी खेळाडूंच्या अशा चाचणी करून दोषी खेळाडूंना खेळण्यास बंदी आणल्याचेही सर्व राज्य संघटनांना फेडरेशनने कळवले आहे. त्यामुळे आपण आपल्या जिल्ह्याच्या संघामधील प्रत्येक खेळाडूकडे जातीने लक्ष देवून खेळाडू अशा गैर गोष्टी करत नाहीत याची खातरजमा करावी. डोपिंग टेस्टची सुरुवात राज्य स्पर्धेपासून करण्याचाही शासनाचा मानस आहे याची जाणीव खेळाडूंना करून द्यावी जेणेकरून **मेडलच्या छोट्या मोहापायी खेळाडूने आपले संपूर्ण करियर आणि आयुष्य वाया घालवण्यापासून आपण सर्वांनी परावृत्त करावे.**

राज्य संघामध्ये निवड झालेल्या खेळाडूला राष्ट्रीय स्पर्धा सहभाग बंधनकारक आहे. संयुक्तिक कारणाशिवाय अथवा योग्य वेळी पूर्वकल्पना न देता राष्ट्रीय स्पर्धेस अनुपस्थित राहून पर्यायाने राज्याच्या खेळाडूंवर अन्याय करणाऱ्या खेळाडूवर निलंबनाची आणि आर्थिक दंडात्मक कारवाई करण्याचा ठराव राज्य संघटनेनी पारित केला आहे.

महाराष्ट्र ज्युदो संघटना कोणत्याही परिस्थितीत, कोणाचेही गैरवर्तन कदापिही सहन करणार नाही. स्पर्धा आणि निवास या ठिकाणी असभ्यपणा, मोठयाने आवाज करणे, मोबाईलवर इतरांना त्रास होईल असा त्याचा वापर करणे इत्यादी गैरवर्तन कोणीही करू नये. निवास, भोजन आणि खेळण्याचा परिसर येथे गैरवर्तन केल्याची माहिती कळवण्याची जबाबदारी सामायिक राहील. याचबरोबर मालमत्तेचे नुकसान कोणीही आणि कोणत्याही कारणाने केल्यास त्या संबंधित संघाकडून तो खर्च वसूल तर केलाच जाईल शिवाय संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल. महाराष्ट्राच्या संघातील त्या जिल्ह्याचे स्थान जाणे अथवा जिल्ह्याचे निलंबनदेखील होवू शकते याची गंभीर नोंद घेऊन, आपल्या शिस्तप्रिय खेळाची परंपरा जबाबदारीने सर्वांनीच पुढे न्यावी ही सर्वांनाच आग्रहाची विनंती. यासाठी संघव्यवस्थापक आणि संघाबरोबरील प्रशिक्षकांना प्रत्येक जिल्ह्याच्या सचिव/अध्यक्षांनी जागरूक रहाण्याच्या सूचना द्याव्यात.

- वैद्यकीय/अपरीहार्य कारणाशिवाय मॅटवर येवून न खेळता वॉकओव्हर देणाऱ्या खेळाडूस / संघास दरवेळी रु 100/- दंड केला जाईल. कारणाची सत्यता राज्य संघटना तांत्रिक समिति सचिव पडताळून पाहातील.

14) संघातील खेळाडूंच्या विम्याची जबाबदारी संबंधित जिल्ह्याची असेल. खेळाडूंना स्पर्धेच्या कालावधीमध्ये अथवा स्पर्धेकरिता येताना अथवा स्पर्धेहून आपल्या गावी परतताना कोणत्याही घटनेमुळे होणाऱ्या इजांची / दुर्घटनांची जबाबदारी संयोजक संघटना अथवा महाराष्ट्र ज्युदो संघटनेवर किंवा त्यांच्या पदाधिकाऱ्यांवर रहाणार नाही. मात्र स्पर्धेदरम्यान प्राथमिक उपचाराची सोय आयोजकांकडून स्पर्धा ठिकाणी करण्यात येईल. पुढील गंभीर उपचाराचा खर्च आणि सोय ज्या-त्या संघास करावी लागेल याची नोंद घ्यावी.

15) सभासद नसणाऱ्या जिल्हा संघटनेस स्पर्धेमधे सहभाग देण्या - न देण्याचा अधिकार महाराष्ट्र ज्युदो संघटनेकडे सुरक्षित असेल.

16) प्रत्येक जिल्ह्यातील खेळाडू हा त्या जिल्ह्यातील रहिवासी असायला हवा. अर्थात कोणताही खेळाडू स्वतःचा जिल्हा सोडून इतर जिल्ह्यातून खेळताना आढळल्यास त्यावर कारवाई होईल तसेच त्यास मदत करणाऱ्या संबंधित क्लब / जिल्हयावरही कारवाई होईल.

17) सर्व पत्रव्यवहार संघटनेच्या लेटरहेडवर प्राधिकृत व्यवस्थापक अथवा सचिव यांच्या स्वाक्षरीने व्हावा.

- ✓ आयजेएफच्या/जेएफआयच्या नव्या नियमांनुसार खेळाडूस प्रोत्साहन देताना (चियरिंग करताना) अथवा कोणत्याही प्रसंगी रेफरीच्या निर्णयावर आक्षेपार्ह प्रतिक्रिया देणे, रेफरीचे लक्ष विचलित करणे आदी घडल्यास कारवाई करण्यात येवू शकते.
- ✓ रेफरींचा निर्णय अंतिम असेल. रेफरीच्या निर्णयाबाबत आक्षेप असल्यास फक्त संघाच्या व्यवस्थापकांनी या संदर्भात मॅट चेअरमन / स्पर्धा संचालक यांच्याशी संपर्क साधावा.
- ✓ आक्षेपार्ह सामन्याचे रेकॉर्डिंग पहाताना राज्य संघटनेच्या अधिकृत कॅमेरामधीलच रेकॉर्डिंग पाहिले जाईल, वैयक्तिक मोबाइलचे रेकॉर्डिंग गृहीत धरले जाणार नाही.
- ✓ राष्ट्रीय स्पर्धांचे परिपत्रक अजून आपल्याला प्राप्त झाले नाही. जर स्पर्धा नियमात काही बदल फेडरेशनद्वारे ऐनवेळेस कळवले गेल्यास तसे बदल विनासूचना अंगिकारण्याचा अधिकार महाराष्ट्र ज्युदो संघटना राखून ठेवत आहे.

महाराष्ट्र ज्युदो संघटनेच्या सर्व उपक्रम/कार्यक्रमाबाबत माहिती सर्वांना कायम उपलब्ध व्हावी यासाठी इंटरनेटवर www.mahajudo.com हे संकेतकेंद्र उपलब्ध असून इच्छुकांनी कृपया यावरून माहिती घ्यावी.
कळावे,

आपला विश्वासू,

Maharashtra Judo Association T.R.No. F-3967 Mumbai

दत्ता आफळे
जनरल सेक्रेटरी
महाराष्ट्र ज्युदो संघटना

## माहिती साठी संपर्क;

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. दत्ता आफळे | जनरल सेक्रेटरी, महाराष्ट्र ज्युदो संघटना | 90499-98765; 94231-50231 | (gs.mahajudo@gmail.com | ज्युदो संदर्भातील अडचणीसाठी |
| श्री शैलेश टिळक | टेक्निकल सेक्रेटरी, महाराष्ट्र ज्युदो संघटना | 94220-29656 | stilak@yahoo.com | |
| श्री आदर्श शेट्टी | महाराष्ट्र ज्युदो संघटना | 98338-57072 | adarsh.shetty07@outlook.com; | वेबसाईट, एंट्रीफॉर्म भरणे-अपलोड अडचणीसाठी |
| श्री विकास देसाई | | 94216-76837 | vikas.acem@gmail.com | |
| श्री उमेश पाटील | जळगांव जिल्हा हौशी ज्युदो संघटना | 97306-23497; | स्पर्धेसंदर्भातील प्रश्न (भोजन-निवास आदीसाठी) संपर्क | |
| श्री अजय काशिद | | 98907-93790 | | |

## Steps to upload Entry Forms

1. Visit www.mahajudo.com

2. Under Events menu, click on Entry form sub-menu.

3. You will find tournament names on that page. Click on the tournament for which the entry form is needed. Entry form will be downloaded.

4. Fill the entry form (in excel sheet format).

5. On website, under Events menu, click on "Upload entry form" submenu.

6. A login page will open. There enter the credentials shared with you.

7. On login, you will see the tournament name, below that there will be a place to upload the file. Click on that button, and select the entry file which you have filled.

8. If the file gets uploaded successfully, you will redirected to a page, where you can find the name of the players which you entered in the entry. Kindly check the name and entries.

If there is any change, kindly contact Adarsh Shetty (9833857072)